# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०१७
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -

(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (१) ते (७)) -

(१) सर्वश्री. शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. आनंदराव पाटील, अमरनाथ राजूरकर, चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"पुणे शहर व जिल्ह्याचा वेगाने होणारा विकास विचारात घेता पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची असलेली नितांत आवश्यकता, यासाठी गेल्या सुमारे दहा वर्षापूर्वीपासून राज्य शासनाकडून सुरु असलेली कार्यवाही, पुणे जिल्ह्यात उद्योग व्यापार-व्यवसायाची मोठ्या प्रमाणात असलेली उलाढाल, नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या पुणे जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात करीत असलेली गुंतवणूक, मात्र विस्तार विकासात आंतरराष्ट्रीय गुंतवणूकीसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाअभावी निर्माण झालेली मोठी अडचण, विकासावर होत असलेला मोठया प्रमाणातील विपरीत परिणाम, पुणे जिल्हयात जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय गुंतवणूक व्हावी, जिल्हयातील व जवळपासच्या भागातील विकास साधता यावा, यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ तातडीने उभारण्याची गरज, यासाठी राज्य शासनाने पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करण्याचा घेतलेला निर्णय, मात्र पुढील कार्यवाहीस होत असलेला विलंब, याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(२) ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. नरेंद्र पाटील, किरण पावसकर, हेमंत टकले, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"ठाणे मनपा सेवेअंतर्गत महानगरपालिकेस जवळपास एक हजार बसेसची आवश्यकता असणे, तथापि सद्यस्थितीत ४७० बसेस असून केवळ १३० बसेसच सुस्थितीत असून उर्वरित बसेस दुरुस्तीअभावी बंद असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी निदर्शनास येणे, बंद पडलेल्या बसेससाठी लागणाऱ्या साधन सामुग्री खरेदी प्रक्रियेत होणारे

*आर्थिक घोटाळे, अवाजवी खर्च व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजना (JNNURM) अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेस जुन्या मॉडेलचे असल्याचे निदर्शनास येणे, तसेच सदर बसेसमध्ये वापरलेले टायर्स व बॅटऱ्या या एक ते दोन वर्षे जुन्या असून त्यावर सन २०१५ हे वर्ष नमूद करण्यात आल्याचे परिवहन समिती सदस्यांनी केलेल्या तपासअंती दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, नवी मुंबई महानगरपालिकेसाठी परिवहन सेवेचा ठेका घेणाऱ्या ठेकेदाराने मिडी बसेसकरिता रुपये ३७/- प्रति किमी तर स्टँडर्ड बसेसचा दर रुपये ४७/- प्रति किमी आहे परंतु ठाणे मनपातील परिवहन सेवेच्या ठेकेदाराने मिडी बसेसकरिता रुपये ५२/- व स्टँडर्ड बसकरिता ६६/- प्रति किमी असा दर दिल्याचे आढळून येणे, त्यामुळे ठाणे मनपा प्रति दिन रुपये ५.४७ लाख सदर ठेकेदारास अधिक द्यावे लागून सदर कामाचा ठेका १० वर्षाचा असल्याने १० वर्षात रुपये २०० कोटी अधिक सदर ठेकेदारास द्यावे लागणार असल्याने तरी सकृतदर्शनी याप्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, याशिवाय परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकित देणी देखील प्रलंबित असणे, त्यामुळे यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत महाराष्ट्र लेबर एकता युनियनकडून तसेच ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रवासी संघटनांकडून गेल्या अनेक वर्षापासून ते आजतागायत वारंवार मागणी करण्यात येणे, तथापि त्याकडे शासनाकडून जाणिवपूर्वक करण्यात येणारे दुर्लक्ष, परिणामी ठाणेवासीय व सर्वसामान्य प्रवासी जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सबब, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(३) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. हेमंत टकले, सुनिल तटकरे, विक्रम काळे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी जि.सांगली .ता. पलूस माळवाडी येथील अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार करुन खून केल्याची घडलेली घटना, तसेच दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी हिंजवडीच्या इन्फोसिस आयटी कंपनीत सॉफ्टवेअर अभियंता म्हणून काम करणाऱ्या रसिला राजू ओपी (वय २५, रा.हिंजवडी) या तरुणीचा कंपनीमध्येच गळा आवळून खून झाल्याची घटना, तर पुणे शहरात हडपसर येथील शिवपार्क येथे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी रात्री घरगुती समस्या पत्नीने फेसबुकावर टाकल्यामुळे संतप्त पतीने पत्नीची*

*हत्या केल्याची घटना, दिनांक २३ डिसेंबर, २०१६ मध्ये अंतरा दास या संगणक अभियंता तरुणीचा हल्लेखोराने भोसकून खून झाल्याची घटना, राज्यभरात कोपर्डी (जि.अहमदनगर) प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले असतांनाच, उपरोक्त घटना घडत गेल्यामुळे सर्वत्र संतापाचे पसरलेले वातावरण, राज्यात उपरोक्त घटनेचे उमटलेले तीव्र पडसाद लक्षात घेऊन स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा, यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१६, दिनांक ८ जानेवारी, २०१७ व दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुन उपरोक्त खून, बलात्कार प्रकरणातील आरोपींवर पोस्को कायद्याअंतर्गत कडक कारवाई करण्याची तसेच सदर घटनेची चौकशी संवेदनशील पध्दतीने होण्यासाठी वरिष्ठ महिला पोलीस अधिका-यांची नेमणूक करण्याची केलेली मागणी, पुणे शहरात हिंजवडी, खराडी, हा परिसर तसेच तळवडे हा पुण्यातील ग्रामीण भागात माहिती—तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची संख्या मोठी असल्याने नोकरीनिमित्त परप्रांतीय महिला, मुली मोठया संख्येने पुण्यातील वेगवेगळया भागामध्ये स्थायिक होणे, सदरहू कंपन्यामध्ये रात्री उशिरापर्यंत काम करणा-या महिलांवर होणारे अत्याचार, खून यांचे प्रमाणात झालेली वाढ, त्यामुळे आय.टी. क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर असणे, यासंदर्भात देखील स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा यांनी दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी पुणे पोलीस आयुक्त, पुणे, यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, उपरोक्त सर्वच घटनांची सखोल चौकशी करुन आरोपीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(४) प्रा. अनिल सोले, श्री. नागोराव गाणार, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्माण झालेली दयनीय अवस्था, सदर हॉस्पिटल करीता सुरक्षा चौकी असून ती बंद स्थितीत असून त्याचे खिडक्या व दरवाजे तुटलेले असणे, त्यातच हॉस्पिटल आवारात व समोर मोठया प्रमाणात कचऱ्यांचे ढिगारे दिसून येणे, रूग्णांकरीता वापरलेली कालबाहय सिरींज व औषधे ही त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावता निष्काळजीपणे हॉस्पिटल व त्या परिसरात टाकण्यात येणे, सुरक्षेच्या दृष्टीने वापरण्यात येणारी अग्निशामक उपकरणे कालबाहय स्थितीत असणे, रूग्णालयाच्या आजूबाजूचा परिसर झुडपी कचऱ्याने व्याप्त असणे, त्यामुळे रूग्णालयात अस्वच्छता निर्माण झाल्याने त्याचा परिणाम रूग्णांवर होणे, त्यामुळे सदर परिसर कचरामुक्त व स्वच्छ ठेवण्याची असलेली आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले*

*अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याबाबत त्वरीत करावयाची कारवाई व उपाययोजना."*

(५) *सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"सन २०१४-१५ IMSR मेडीकल कॉलेज मायणी, जि.सातारा येथे ९५ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. या वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेणे, या मेडीकलमध्ये प्रवेश घेते वेळेस राज्यातील वैद्यकीय शिक्षण संचलनालय (डि.एम.ई.आर.) व आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक एम.सी.आय., दिल्ली या मेडीकल कॉलेजला मान्यता असणे, मेडीकल कॉलेजने प्रवेश देते वेळी या विद्यार्थ्यांची एम.एच.सी.ई.टी. परिक्षा न घेता, ए.एस.एस.ओ.-सी.ई.टी. मधुन प्रवेश दिलेला असणे, त्यामुळे विद्यापीठ व एम.सी.आय यांनी या ९५ विद्यार्थ्यांचे प्रवेश अनियमित ठरवून तसे पत्र सदर महाविद्यालयास जानेवारी २०१५ मध्ये पाठविणे, पत्र मिळूनसुध्दा या महाविद्यालयाने या विद्यार्थ्यांना अंधारात ठेवून शैक्षणिक वर्ष सुरु ठेवणे, या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय व तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या विद्यार्थ्यांनी सप्टेंबर, २०१५ मध्ये विद्यापीठाची पूरवणी परिक्षा देणे, परंतू दिनांक १० मार्च, २०१६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यामुळे या विद्यार्थ्यांचे भवितव्य पुन्हा अधं:कारमय होणे, या विद्यार्थ्यांनी प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांना भेटून त्यांचे भवितव्य वाचविण्याची विनंती केली असता प्राधिकरणाने त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश नियमित करण्याचा निर्णय घेऊन महाविद्यालयास प्रती विद्यार्थ्यांमागे २० लाख रु.दंड आकारुन सदरहू रक्कम ३ महिन्यात भरण्याचे प्रतिज्ञापत्र महाविद्यालयाने प्राधिकरणास सादर करणे, महाविद्यालयाने उर्वरीत दंड भरण्यास टाळाटाळ केल्यामुळे या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता शासनाने विद्यार्थ्यांना पाठींबा देण्यास व त्यांना इतर महाविद्यालयात सामावून घेण्यास संमती देणे, प्राधिकरणाने आकरलेला दंड शासनाने भरावा व नंतर तो महाविद्यालयाकडून वसूल करावा असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यामुळे शासनाने २० कोटी रुपये न्यायालयात भरणे, शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आश्वासनानूसार या विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयात अद्यापही सामावून न घेतल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी दिनांक १ मार्च, २०१७ पासून आझाद मैदान, मुंबई येथे सुरु केलेले आमरण उपोषण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

(६) *श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"देशभरात निर्माण होणाऱ्या सुमारे ५ लाख टन ई -कचरा निर्मितीत राज्याचा क्रमांक पहिला असणे. कॉम्प्यूटरचे मॉनिटर, की-बोर्ड, माऊस,मोबाईलचे सुटे भाग, बंद पडलेली इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, टेलिविजन, इलेक्ट्रॉनिक्स खेळणी, बंद पडलेले सेल ई.वस्तू व ई-कचऱ्यात समाविष्ट असणे, यातील अनेक वस्तू सामान्य भंगाराचाच भाग समजून राज्यातील असंख्य भंगार जमा करणाऱ्या मुलांकडून जमा होत असणे, परंतु त्यांना या वस्तूंची विल्हेवाट लावण्याचे ज्ञान नसणे.परिणामी अनेक वस्तू डम्पिंग ग्राउंड पर्यंत पोहोचून जमिनी खाली दाबल्या जाणे, या वस्तूंमधील पारा, शिसे, कॅडमीअम, क्रोमिअम, बेरीअम आणि ब्लॉक कार्बन अशा धोकादायक पदार्थांपासून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास व मानवी आरोग्यावर अत्यंत घातक व गंभीर परिणामांची जागरुकता सामान्य जनतेला नसणे, या ई-कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी केवळ २४ अधिकृत केंद्र असून त्यांची वार्षिक क्षमता ३२ हजार ६०० टन इतकीच असणे, मोठ्या शहरातील आय टी कंपन्या बरोबरच राज्यातील अनेक शहरांमध्ये हा ई-कचरा असाच जमिनीखाली दाबला जाणे, या अत्यंत घातक व गंभीर विषयाबाबत शासनाने जनमानसांत जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

(७) *सर्वश्री. जयंत पाटील, धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, प्रविण दरेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील साखर कारखान्यांना मूलभूत सुविधा संमती (इन्फ्रास्ट्रक्चर क्लीअरन्स) प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी (एम.एस.सी.डी.सी.एल.) बरोबर वीज खरेदी करार (पॉवर परचेस ॲग्रिमेंट) करण्यास अडचण येणे, पॉवर परचेस ॲग्रिमेंट किमान २ हजार मेगा वॅटसाठी संमती मिळणे आवश्यक असणे, ज्या कारखान्याकडे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत त्या कारखान्यांना शेतकऱ्याना एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, परंतु ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत. अशा कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे ते साखर कारखाने आर्थिक संकटात सापडणे, ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत त्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पात समाविष्ट करून घेतल्यास त्यांच्यावर येणारे आर्थिक संकट दूर होऊन त्या साखर कारखान्यांना शेतकऱ्यांना*

एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, यासाठी अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही."

**(दुपारी १२.०० वाजता)**

एक : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.

दोन : प्रश्नोत्तरे.

तीन : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."

चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).

पाच : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

## - मध्यंतर -

सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).

सात : शासकीय विधेयके -

(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(१) "सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६"

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

-----------------------------------------------------------------------
-----

*(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"*

-----------------------------------------------------------------------
-----

*(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"*

-----------------------------------------------------------------------
-----

*आठ : (क) सर्वश्री.धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदुरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, अनिल तटकरे, आनदराव पाटील, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -*

*"केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे शेतीमालाच्या दरात मोठी घसरण होणे, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी उत्पादित मालाला बाजारपेठेत भाव नसणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात मागील तीन वर्षात ९ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, सन २०१६ या एकाच वर्षात सुमारे तीन हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात केवळ मराठवाड्यात ११७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व नापीकीला कंटाळून आत्महत्या करणे, सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होत नसणे, मागील वर्षी डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शासनाने डाळ वर्गीय पिकांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले, यावर्षी तुरीचे विक्रमी उत्पादन होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठेतील तुरीचे भाव मोठ्या प्रमाणावर*

*कोसळणे, शासनाने आधारभूत किंमतीने तुर खरेदी करण्याचा निर्णय घेणे, मात्र तुर खरेदीबाबत कोणतेही नियोजन नसल्यामुळे तुर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, राज्यात लाखो क्विंटल तुर खरेदी केंद्रावर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तुर उत्पादक शेतकरी आठ ते दहा दिवस रांगेत तुर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तुर उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी वाट पाहण्याची वेळ येणे, कर्मचारी आणि व्यापारी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना कमी भावाने स्थानिक व्यापाऱ्यांना तुर विक्री करण्याची वेळ येणे, कांदा, हरभरा, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरीसुध्दा मोठ्या प्रमाणावर अडचणीत असणे, शासनाने शेती मालाचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेती मालाला बोनस देण्याचे धोरण स्विकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करु अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करुन बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(ख) (बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —*

*श्री.सुजितसिंह ठाकूर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.तानाजी सावंत, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपिकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -*

*"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची*

*कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षांवर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पिक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -*

*(१) श्री. किरण पावसकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"राज्यात अन्न, दुध, फळे, भाज्या, खाद्यतेल व तत्सम खाद्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी उपाययोजना करणे, अन्न पदार्थांमध्ये वापरण्यात येणारे रंग निकृष्ट दर्जाचे असल्याने अनेक रोगांचा प्रादुर्भाव होणे, अन्न व औषध प्रशासनात कर्मचारी, प्रयोगशाळा व तत्सम साधनांचा अभाव असणे, मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात दुध भेसळ होणे, अन्न भेसळ करणाऱ्यांच्या बाबतीत कायद्यात असणाऱ्या तरतुदी शिक्षा, दंड अधिक प्रभावी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(२) प्रा. अनिल सोले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"चंद्रपूर जिल्ह्यात आरोग्य सुविधेचा अभाव असणे, जिल्ह्यात ५८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३३९ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, ३ उपजिल्हा रुग्णालय व १० ग्रामीण रुग्णालय असणे, तसेच मूल, वरोरा, चिमूर या उपजिल्हा रुग्णालयातील वर्ग-१ व वर्ग-२ ची तज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असणे, उपजिल्हा रुग्णालयातील वर्ग-१ ची ३ पदे मंजूर असून त्यापैकी एकच पद भरण्यात आलेले असणे, वर्ग-२ ची २९ पदांपैकी ११ पदे रिक्त असणे व जिल्हा सामान्य रुग्णालयात १६६ पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांवर योग्य उपचार न होणे, सदर डॉक्टरांची व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ८ मार्च, २०१७.*

*उत्तमसिंग चव्हाण,*
*सचिव,*
*महाराष्ट्र विधानपरिषद.*